**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 24.10.2025** **वार-शुक्रवार**

---

**<u>रोजगार मेळावा</u>**

आज केंद्र सरकार तर्फे देशभरात 40 ठिकाणी रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलं आहे. याव्दारे 51 हजार तरूणांना नियुक्ती पत्र देण्यात आली. देशाच्या युवावर्गाची स्वप्ने रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून पूर्ण होत आहेत, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीत सतराव्या रोजगार मेळाव्याला व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून संबोधित करताना म्हटलं आहे.

पुण्यात टपाल विभागाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आली. देशाच्या लोकसंख्येत तरुणांची संख्या सर्वाधिक असून ही तरूण पिढी देशाची ताकद असून गुणवत्तापूर्ण शिक्षण, कौशल्य विकासासहित अनेक क्षेत्रात तरुणांना रोजगार मिळू लागले असून, सर्व समावेशक विकास या उद्देशाने केंद्र सरकार कार्यरत आहे तसंच केंद्र सरकारच्या नोकरीमध्ये तरूण पिढीला सामावून घेणं याचा उद्देश असल्याचं मत मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केलं. टपाल खात्याच्या पुणे विभागाचे संचालक अभिजित बनसोडे यावेळी उपस्थित होते. यावेळी मोहोळ यांच्या हस्ते 102 उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्यात आली.

**<u>निधी</u>**

भारताच्या समृद्ध जैविक वारशाचे संरक्षण आणि स्थानिक समुदायांना त्यांच्या योगदानाचे फायदे मिळवून देण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय जैवविविधता प्राधिकरणाने जैवविविधता संवर्धनासाठी 1 कोटी 36 लाख रुपयांचा निधी जारी केला आहे.

यामध्ये पुणे जिल्ह्यातील हवेली तालुक्यातील कुंजीरवाडी या गावाला 45 लाख 50 हजार रुपयांचा निधी प्राप्त होणार आहे. यामुळे जैवविविधतेच्या संवर्धनासह शाश्वत विकासाला प्रोत्साहन मिळण्यास मदत होणार आहे.

**अधिकारादेश**

पुणे महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांचे सहायक आयुक्त आणि परिमंडळाचे उपायुक्त यांचे अधिकार वाढविण्याचे आदेश महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी दिले आहेत. पुणे शहरात 15 क्षेत्रीय कार्यालये आहेत. त्यामधील सहायक आयुक्तांना तीन लाखांपर्यंत, तर परिमंडळ उपायुक्तांना दहा लाखांपर्यंतच्या निविदांचे अधिकार होते. मात्र, गेल्या तीन वर्षापासून महापालिका निवडणुका न झाल्याने शहरातील अनेक भागांतील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था आणि अंतर्गत रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. यावेळी या कामांसाठी खर्च करण्यास क्षेत्रीय कार्यालयांकडे अधिकार आणि निधी नसल्याने कामे रखडल्याच्या तक्रारी येत होत्या. ही बाब लक्षात घेऊन हे अधिकार वाढविण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**विधी सप्ताह**

सर्वोच्च न्यायालयापासून ते खात्यांतर्गत सुरू असलेले दावे निकाली काढण्यासाठी नोंदणी आणि मुद्रांक शुल्क विभागाने 27 ऑक्टोबर ते 2 नोव्हेंबर या कालावधीत विधी सप्ताह आयोजित केला असल्याची माहिती या विभागाचे उपमहानिरीक्षक राजेंद्र मुठे यांनी दिली आहे.

**बैलगाडी**

राज्यात बैलगाडीतून साखर कारखान्यांकडे ऊस वाहतूक करताना बैलांना क्रूरतेची वागणूक देण्यात येऊ नये, अशी महत्त्वपूर्ण सूचना राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांनी सर्व सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांना दिल्या आहेत. बैलांवर क्षमतेपेक्षा जास्त वजन लादू नये तसेच सूर्योदयापूर्वी किंवा सूर्यास्तानंतर पशुधनाची पायी ने-आण करू नये , आजारी, जखमी, कुपोषित आणि जास्त वय असलेल्या

बैलांचे स्वास्थ्य उचित राहावे, यासाठी त्यांना सक्तीची विश्रांती देण्यात यावी असंही साखर आयुक्तांनी म्हटलं आहे.

**वेतन**

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या  कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोगाच्या फरकाच्या रकमेच्या दुसरा हप्त्यासाठी 84 कोटी 15 लाख रुपये देण्यास पुणे महापालिकेच्या स्थायी समितीने मंजूरी दिली आहे. तसेच महापालिकेकडून कर्मचारी, शालेय विद्यार्थी आणि अन्य नागरिकांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या बस पासांच्या रकमेपोटी 20 कोटींचा निधीही दिला जाणार आहे. पुणे महापालिकेचा 60 टक्के हिस्सा म्हणून 84 कोटी 15 लाख रुपये देण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने स्थायी समितीच्या बैठकीत मंजूरीसाठी ठेवला होता. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला मंजूरी देण्यात आली.

**क्रीडा**

रत्नागिरी जिल्हा टेनिक्वाईट संघटना आयोजित 42 वी कनिष्ठ राज्य टेनिक्वाईट अजिंक्यपद स्पर्धा 26 ते 28 ऑक्टोबर दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुणे जिल्हा संघाची निवड करण्यात आली आहे. मुलांच्या गटाचे नेतृत्व विराज मोरे याच्याकडे सोपवण्यात आले आहे. तर कस्तुरी बाजारे हिच्याकडे मुलींच्या संघाचे कर्णधारपद दिले आहे. या स्पर्धेतून जम्मू येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ निवड करण्यात येणार आहे.

दरम्यान इंडियन डेफ क्रिकेट असोसिएशन यांच्यावतीने 3 ते 9 नोव्हेंबर  या कालावधीत नवी दिल्ली येथे 9 वी राष्ट्रीय डेफ वीस षटकांची क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. कर्णबधीरांसाठीच्या या स्पर्धेसाठी महाराष्ट्र डेफ क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मध्यवर्ती भांडार विभागाचे भांडारपाल विवेक मालशे यांची निवड करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्यावतीने विवेक मालशे यांचा नुकताच सत्कार करण्यात आला.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 तर किमान तापमान 21 पूर्णांक 4 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्यादुपारनंतर अतिहलक्या स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**